# राज्य निवडणूक आयोग
## महाराष्ट्र

१ ला माळा, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.


---

(प्रसिद्धिपत्रक) दि. १६ ऑक्टोबर २०२२

### विविध जिल्ह्यांतील १०७९ ग्रामपंचायतींसाठी प्राथमिक अंदाजानुसार ७४ टक्के मतदान

मुंबई, दि. १६ (रानिआ): विविध १८ जिल्ह्यांमधील १ हजार ७९ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांत प्राथमिक अंदाजानुसार आज सरासरी सुमारे ७४ टक्के मतदान झाले. यात सदस्यपदांसह थेट सरपंचपदासाठीदेखील मतदान पार पडले.

राज्य निवडणूक आयोगाने १ हजार १६५ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांची घोषणा केली होती. त्यातील काही ठिकाणी सरपंचपदाच्या; तर काही ठिकाणी सदस्यपदाच्या निवडणुका बिनविरोध झाल्या. त्यामुळे आज प्रत्यक्षात १ हजार ७९ ग्रामपंचायतींसाठी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळत मतदान झाले. दुपारी ३.३० पर्यंत प्राथमिक माहितीनुसार सरासरी ६४.८३ टक्के मतदान झाले होते. काही ठिकाणी सायंकाळी उशिरापर्यंत मतदारांच्या रांगा होत्या. नक्षलग्रस्तभागात दुपारी ३ वाजेपर्यंतच मतदानाची वेळ होती. सर्व ठिकाणी उद्या (ता. १७ ऑक्टोबर) मतमोजणी होईल.

**मतदान झालेल्या ग्रामपंचायतींची जिल्हानिहाय संख्या: ठाणे**- १३४, **पालघर**- ३३६, **रायगड**- १६, **रत्नागिरी**- ३६, **सिंधुदुर्ग**- ४, **नाशिक**- १८७, **नंदुरबार**- २००, **पुणे**- १, **सातारा**- ४, **कोल्हापूर**- ३, **अमरावती**- १, **वाशीम**- १, **नागपूर**- १५, **वर्धा**- ९, **चंद्रपूर**- ९२, **भंडारा**- १९, **गोंदिया**- ५ आणि **गडचिरोली**- १६. **एकूण**- १०७९.

-०-०-०-

(Jagdish More, SEC)